**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक २३ डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठीचे उमेदवारी अर्ज भरायची प्रक्रिया आजपासून सुरू.**
2. **राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार–२०२५ प्रदान; प्रा. जयंत नारळीकर यांना मरणोत्तर 'विज्ञानरत्न' पुरस्कार.**
3. **राज्यात रस्ते अपघातांतील मृत्युदरात घट, नागपुरातील प्रमाण 21 टक्यांनी कमी.**
4. **विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मय पुरस्कार जाहीर: 14 जानेवारी रोजी होणार वितरण.**

**उमेदवारी अर्ज**

राज्यातल्या २९ महानगर पालिकांच्या निवडणुकांसाठीचे उमेदवारी अर्ज भरायची प्रक्रिया आजपासून सुरू झाली आहे. ३० डिसेंबरपर्यंत ही प्रक्रिया चालणार असून, अर्जांची छाननी ३१ डिसेंबर रोजी होईल. दोन जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येणार असून, निवडणूक चिन्हांचं वाटप आणि अंतिम उमेदवारांची यादी, तीन जानेवारी रोजी प्रसिद्ध होणार आहे. या सर्व महानगर पालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून, १६ जानेवारी रोजी मतमोजणी होईल. दरम्यान, नागपुरात ६७७ नामांकन अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी २४५ अर्ज प्रतीक्षा यादीत आहेत.

**विज्ञान पुरस्कार**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार-२०२५ प्रदान करण्यात आले. नवी दिल्ली इथं राष्ट्रपती भवनात आयोजित या कार्यक्रमात विज्ञान क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल पद्मविभूषण प्रा. जयंत विष्णू नारळीकर यांना मरणोत्तर 'विज्ञानरत्न' पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. यावेळी 'विज्ञान श्री' पुरस्कार आठ शास्त्रज्ञांना, तर 'विज्ञान युवा-शांती

स्वरूप भटनागर' श्रेणीत १४ तरुण शास्त्रज्ञांना गौरविण्यात आलं. 'विज्ञान संघ' पुरस्कार CSIR (सी. एस. आय. आर.)च्या 'टीम अरोमा मिशनला' देण्यात आला आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी हे देशातील सर्वोच्च सन्मान वार्षिक स्वरूपात देण्यात येतात.

**जी रामजी**

विकसित भारत जी रामजी योजनेसाठी एक लाख ५१ हजार कोटी रुपये तरतूद केली असल्याची माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी आज दिली. चौहान यांनी एका व्हिडिओ संदेशात सांगितलंय की, आता १०० दिवसांऐवजी सव्वाशे दिवसांच्या रोजगाराची हमी ग्रामीण भागत सरकारने दिली आहे. मनरेगा या पूर्वीच्या योजनेच्या नावाखाली नवीन योजनेची जाणीवपूर्वक बदनामी केली जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

**वर्धा जिल्हा रुग्णालय**

वर्धा जिल्ह्याच्या सामान्य रुग्णालयाच्या इमारत क्रमांक दोन मध्ये आज आग लागली. दुसऱ्या माळ्यावरील बाळ रुग्ण विभागाच्या बाजूला असलेल्या सामानाच्या रूमला ही आग लागली होती. वेळीच हे लक्षात आल्याने इमारतातील रुग्णांना स्थलांतरित करण्यात आलं. कुणालाही दुखापत झाली नसून अग्निशमन दलाने घटनास्थळी पोहोचत आगेवर नियंत्रण मिळविल्याचं जिल्हा शल्य चिकित्सक सुमंत वाघ यांनी सांगितलं.

***(होल्ड बाईट - सुमंत वाघ - २९ सेकंद)***

***जिल्हा सामान्य रुग्णालय, वर्धा येथे बिल्डिंग नंबर दोनमध्ये फ्रेडरिक वॉर्ड आहे आणि त्याच्या बाजूला एन.आर. सी.ची रूम आहेत तसेच सर्जिकल वॉर्ड आहे त्याच्या बाजूला स्टोर रूम असल्या ठिकाणी बहुतेक शॉर्ट सर्किट मुळे आग लागली असावी. हे सर्व रुग्ण नातेवाईकांना रूम, पूर्ण बिल्डिंग खाली करायला लावली आणि बाजूच्या आय. सी.यू. मध्ये रुग्णाला शिफ्ट करण्यात आलं आहे. एकंदरीत रुग्ण 10 होते. त्यामुळे रुग्णा सर्व व्यवस्थित आहेत आहे. ते गाडी आलेलली आहे आणि त्यांनी आग विझवण्याचा पर्यंत केला आहे आग पूर्णपणे आटोक्यात आलेला आहे.***

**‘क’ तीर्थक्षेत्र दर्जा**

विदर्भाची पुरातन राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमरावती जिल्ह्यातील श्रीक्षेत्र कौंडण्यपूर इथल्या अंबिका पीठ आणि रुक्मिणी पीठाला शासनाकडून अधिकृतपणे ‘क’ तीर्थक्षेत्र दर्जा मंजूर झाला आहे. या निर्णयाबद्दल भाविकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. रुक्मिणीचे माहेर म्हणून कौंडण्यपूर प्राचीन इतिहासाचा भाग राहिले आहे.

**संतोष देशमुख**

मराठवाड्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी वाल्मिक कराड आणि त्यांच्या सहकाऱ्यांविरोधात आज आरोप निश्चित झाले. वाल्मिक कराड आणि त्यांच्या साथीदारांनी ही हत्या केल्याचं आरोपपत्रात नमूद आहे, असं विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम म्हणाले. कारागृहात असलेल्या आरोपींना हे आरोप वाचून दाखवण्यात आले असून त्यांनी हे सर्व आरोप फेटाळल्याची माहिती निकम यांनी दिली.

**अटल दौड**

देशाचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त येत्या २५ डिसेंबर रोजी अमरावतीत राज्यस्तरीय ‘अटल दौड’ हाफ मॅरेथॉनच आयोजन करण्यात आल आहे.गुरुकुल बहुउद्देशीय संस्था आणि अमरावती जिल्हा ॲथलेटिक संघटनेच्या विद्यमाने होणाऱ्या या स्पर्धेसाठी आतापर्यंत २ हजार ११५ धावपटूंनी नोंदणी केली आहे. नेहरू मैदान येथून सकाळी सहा वाजता मॅरेथॉनला सुरुवात होणार असून विविध वयोगटांमध्ये स्पर्धा घेतल्या जाणार आहेत.

**रस्ता सुरक्षा**

महाराष्ट्रात रस्ता सुरक्षेसाठी परिवहन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपाय योजनांचा सकारात्मक परिणाम दिसून येत असून नोव्हेंबर २०२५ पर्यंत अपघाती मृत्यूंच्या संख्येत घट नोंदविण्यात आली आहे. जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत अपघातांची संख्या किंचित वाढली असली तरी मृत्यू ११९ नं कमी झाले आहेत. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर अपघाती मृत्यूंमध्ये २६ टक्के घट झाली असून, अपघातांची देखील संख्या कमी झाली आहे. नागपूरात 21% सह पालघर, अमरावती, पुणे यांसह अनेक जिल्ह्यांत, मृत्युदरात लक्षणीय घट झाली असल्याचं परिवहन विभागाने स्पष्ट केलं आहे. राज्यात २०३० पर्यंत रस्ता अपघात ५० टक्क्यांनी कमी करण्याचं उद्‌दिष्ट ठेवण्यात आलं आहे.

**विदर्भ साहित्य संघ**

विदर्भ साहित्य संघाच्यावतीने दिल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय आणि इतर वाङ्मय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. येत्या 14 जानेवारी रोजी विदर्भ साहित्य संघाच्या वर्धापन दिन समारंभात हे वाङ्मय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या सर्व पुरस्कारांचे स्वरूप ५,००० रु. रोख आणि सन्मानचिन्ह अस आहे. ऐकुया याबाबतचा वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून-

***(व्हॉइस कास्ट - नम्रता)***

***"शिक्षणाचा गुताडा" आणि "समर ऑफ सेवेंटी नाईन" या कादंबऱ्यांसाठी अनुक्रमे धोंडुजी इंगोले आणि सुरेंद्र दरेकर यांना पु.य. देशपांडे स्मृती पुरस्कार जाहीर झाला असून डॉ.सुभाष बाभुळकर यांना "डॉ.आनंदकुमार स्वामी" या ग्रंथासाठी डॉ.वा.वि.मिराशी स्मृती वैचारिक वाङमय पुरस्कार प्रदान करण्यात येईल. "आस्वाद" या पुस्तकासाठी डॉ. रविकिरण पंडित हे कुसुमानिल स्मृती समीक्षा पुरस्काराचे मानकरी ठरले असून "आदिकाल: एक इतिहास (पूर्वार्ध+ उत्तरार्ध )" या ग्रंथासाठी डॉ. अनिरुद्‌ध वझलवार यांना पुरस्कार दिला जाईल. प्रमोदकुमार अणेराव यांना "भंडा-याच्या डोंगरावरून लाईव्ह" या काव्यसंग्रहासाठी शरदचंद्र मुक्तीबोध स्मृती काव्य लेखन पुरस्कार दिला जाईल तर "कपाळ गोंदण" या ग्रंथासाठी निशा डांगे आणि "घानमाकड" या ग्रंथासाठी अविनाश महालक्ष्मे यांना पुरस्कार देण्यात येणार आहे. डॉ.साधना काळबांडे यांना "कोचम" या***

*कथासंग्रहासाठी, आर.आर. पठाण यांना "गावाकडच्या कथा" या कथासंग्रहासाठी तसेच सुनील बावणे- निल यांना "स्याडा कोटसा भरते" या काव्यसंग्रहासाठी आणि डॉ.देवेंद्र तातोडे यांना "वणवा पेटत आहे" या काव्यसंग्रहासाठी नवोदित साहित्य लेखन पुरस्कार घोषित झाला आहे. कविवर्य ग्रेस यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ "युगवाणी" नियतकालिकातील सर्वोत्कृष्ट लेखासाठी दिला जाणारा पुरस्कार यंदा प्रेषित सिद्धभट्टी यांच्या कवितेला जाहीर झाला आहे. याशिवाय आत्मचरित्र, नाटक, संशोधन, अनुवाद आदी विभागातील पुरस्कार विजेत्यांची नावे घोषित करण्यात आली आहे. (आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी नम्रता फलके)*

**एक दिवस सैनिकांसाठी**

अमरावती जिल्ह्यात सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी 'एक दिवस सैनिकांसाठी' हे अभियान राबविण्यात येणार असल्याची घोषणा जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केली. जिल्हाधिकारी कार्यालयात सशस्त्र सेना ध्वजदिन-२०२५ निधी संकलनाचा आरंभ आणि माजी सैनिक मेळावा त्यांच्या हस्ते पार पडला. सैनिक, शहीदांचे कुटुंबीय, वीरमाता आणि वीरपत्नी यांना शासकीय मदत प्रभावीपणे मिळावी, हा या उपक्रमाचा उद्देश असल्याच त्यांनी सांगितलं. यावेळी ध्वजदिन निधीसाठी अधिक योगदान देण्याचं आवाहनही करण्यात आलं.

**मानधनात वाढ**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं देशांतर्गत महिला क्रिकेटपटू तसेच सामना अधिकाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्यास मान्यता दिली आहे. भारतीय महिला संघाच्या ऐतिहासिक विश्वचषक विजयानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्ये अधिक समन्यायी आणि समान वेतनरचना निर्माण करणे हा यामागचा उद्देश असल्याचं बीसीसीआयनं म्हटलं आहे. नवीन वेतन रचनेनुसार, वरिष्ठ महिला क्रिकेटपटूंना देशांतर्गत स्पर्धासाठी आता दररोज ५० हजार रुपये मानधन मिळणार असून, यापूर्वी हे मानधन २० हजार रुपये होते. तसेच राखीव महिला क्रिकेटपटूंना आता १० हजार रुपयांऐवजी दररोज २५ हजार रुपये मानधन मिळणार आहे.

**महिला क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये, भारत विरुद्ध श्रीलंका पाच सामन्यांच्या टी-ट्वेंटी मालिकेतला दुसरा सामना आज विशाखापट्टणम इथल्या डॉ.वाय.एस.राजशेखर रेड्डी ए.सी.ए.-व्ही.डी.सी.ए.मैदानावर होणार आहे. सामना सायंकाळी सात वाजता सुरू होईल.

**हवामान**

विदर्भात गोंदिया जिल्ह्यात सर्वात कमी 9 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. नागपूर इथं ९.६, भंडारा इथं १० अंश सेल्सिअस तर यवतमाळ आणि वर्धा इथं १०.५ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. आगामी काही दिवस हवामान कोरडं राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवला आहे.

**वाङ्मय पुरस्कार**

यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार-२०२५ साठी अर्ज मागविण्यात आले असून, एक जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत प्रकाशित प्रथम आवृत्ती पुस्तके, या स्पर्धेसाठी पात्र आहेत. येत्या एक ते ३० जानेवारी दरम्यान, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे, पुस्तकं पाठविण्याचं आवाहन, मंडळानं प्रसिद्धी पत्रकातून केलं आहे.

*****